# प्रेसनोट

पॉन्झी / एमएलएम स्कीमद्वारे भोळया गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी एप्रिल २०२५ मध्ये मुंबई पोलीस दलात आर्थिक गुन्हे विभाग अधिनस्त आर्थिक गुप्तवार्ता पथक (EIU) ची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकास गोपनिय माहिती प्राप्त झाली की, "AI Origin / Digital Origin" या कथित कंपनीचे संचालक AI Origin.in संकेतस्थळाद्वारे, व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे, महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये प्रत्यक्ष आयोजीत सेमिनारद्वारे, लोकांना बेकायदेशीर गुंतवणूक योजनांची माहिती देत आहेत. तसेच जाहिराती प्रसिध्द करुन, सदर योजनांमध्ये अल्पावधीत, अवास्तव व सातत्यपूर्ण निश्चित परतावा मिळवुन देण्याचे आमिष दाखवित आहेत. त्याचबरोबर 'सभासद जोडणीद्वारे' गुंतवणूकदार जोडणाऱ्या सभासदास अधिकचा परतावा देण्याचे आमिष दाखवून बेकायदेशीर रित्या गुंतवणूक स्विकारत आहेत.

उपरोक्त प्राप्त माहितीच्या पडताळणीमध्ये "AI Origin / Digital Origin" या कथित कंपनीचे संचालक १) श्रीकृष्ण पांडूरंग चव्हाण, अध्यक्ष व कार्यकारी संचालक रा.ठी- वसई, जिल्हा - पालघर २) अंकुश शांताराम पार्टे, कार्यकारी संचालक, रा.ठी- घाटकोपर, मुंबई ३) सुभाष यशवंत पंडेरे, कार्यकारी संचालक, रा.ठी- बोरिवली, मुंबई व नमूद कथित कंपनीचे एजंट व इतर यांनी त्यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) तसेच सिक्यूरिटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI) अशा सक्षम प्रधिकरणांकडून कोणताही परवाना/नोंदणी प्राप्त नसताना बेकायदेशीर रित्या गुंतवणूक स्विकारत आहेत. बेकायदेशिर गुंतवणूक योजनेच्या माध्यमातून मुंबईसह महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमधील गुंतवणूकदारांना अवास्तव परताव्याचे आमिष दाखवून, त्यांच्याकडून रोखीने तसेच बॅंकेच्या मार्फतीने रु. ३० कोटीपेक्षा अधिक गुंतवणूक स्विकारली आहे. तसेच ठाणे, पालघर, पिंपरी- चिंचवड, सांगली, सातारा, कोल्हापुर व सोलापुर येथे नमूद कंपनीचे नविन कार्यालय सुरु/प्रस्तावित असून कर्नाटक, गोवा राज्यात त्यांचे एजंटमार्फतीने कामकाज सुरु असल्याचे निष्पन्न झाले आहे.

"AI Origin / Digital Origin" कंपनी तसेच कंपनीचे पदाधिकारी व इतर यांच्या विरुध्द दि. १२/०८/२०२६ रोजी गु.र.क्र. ७९/२०२६, कलम ३१८(४), ३(५) बीएनएस सह कलम २१(१), २१(२), २३, २६ बेकायदेशीर गुंतवणूक योजना अधिनियम, २०१९ (पंतनगर पोलीस ठाणे गु.र.क्र. ८४४/२०२६) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

"AI Origin / Digital Origin" कंपनीचे १) श्रीकृष्ण पांडूरंग चव्हाण, अध्यक्ष व कार्यकारी संचालक २) अंकुश शांताराम पार्टे, कार्यकारी संचालक, ३) डॉ. सुदेश मोहिते, एजंट, मुंबई शहर यांना दि.१३/०८/२०२६ रोजी आणि ४) सुभाष पंदेरे, संचालक यांना दि. १४/०८/२०२६ रोजी नमूद गुन्हयामध्ये अटक करण्यात आली आहे.

"AI Origin / Digital Origin" या कथित कंपनीचे कार्यालय १) १०१, छोटा परिवार, शिवकृपा पतपेढी, भाविक क्रियेशन्स समोर, वसई (प), पालघर २) ५३७, मेन फ्रेम, आय.टी. पार्क, बी- विंग, रॉयल पाम, आरे कॉलनी, गोरेगाव (पू) मुंबई, ३) एजंट कार्यालय- कुरार व्हिलेज, गावदेवी मंदीराजवळ, आर्युवेदीक दवाखाना, मालाड (पू) मुंबई तसेच अटक आरोपींच्या घरझडतीमध्ये रु. १२,०८,०००/- रोख रक्कम, एकूण ०९ बॅंक खात्यांचे पासबुक, एक बी.एम.डब्ल्यू मोटार कार, एक वेरना कार, एकूण ०७ लॅपटॉप/डेस्कटॉप हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई आर्थिक गुप्तवार्ता पथकातील प्रभारी पोलीस निरीक्षक उमेश गौंड, तत्कालीन प्रभारी पोलीस निरीक्षक कॅलीस्टस डिमेलो, पोलीस निरीक्षक संतोष तोरे, संजय भोसले, सुनिल लांघी, प्रविण खराडे, सपोनि तुकाराम परब, मिलिंद बोरसे, संदीप पिसे, तुषार सावंत, पोउनि विक्रम काळे, सहा.पो.उपनिरी/३२०८४ मंगेश सावंत, पो.ह/९६०१८४ रमेश आव्हाड, पो.ह/०६१०८५ अनंत कुलकर्णी, पो.ह/०७०६०१ किरण चव्हाण, पो.शि/०९२२५७ ललित महाजन, पो.शि/१३०००३ अमित पाटील , पो.शि/१४०३९१ आदित्या घाडीगावकर, पो. शि/११०२४१ नवनाथ पानसरे, मपोशि/ २१६५०६ प्रिया दरे व पथक यांनी केलेली आहे. नमूद गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुप्तवार्ता पथक येथे सुरु आहे.

Scanned with CamScanner